महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/एनएसपी पोर्टल/२०२०/ 3527 दिनांक : २७.१०.२०२०.

29 OCT 2020

**महत्वाचे परिपत्रकः**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील
अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/एचएमसीटी/वास्तूशास्त्र/व्यवस्थापनशास्त्र
पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणा-या सर्व संस्था,

विषय : National Scholarship Portal (NSP) पोर्टलवर (संकेत स्थळ www.scholarships.gov.in) ऑनलाईनरित्या राबविण्यात येणा-या केंद्र शासनाच्या स्कॉलरशिप योजनांकरीता आवश्यक (NSP) पोर्टलवरील रजिस्ट्रेशन व All India Survey on Higher Education (AISHE) कोड प्रमाणपत्राची माहीती सादर करणेबाबत...

उपरोक्त विषयास अनुसरुन, या विभागीय कार्यालयांतर्गत येणा-या सर्व तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या पदविका व पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांना सूचित करण्यात येते कि, आपल्या संस्थेमध्ये शिक्षण घेत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या स्कॉलरशिप योजनांचा लाभ घेण्याकरीता संस्थेचे National Scholarship Portal (NSP) पोर्टलवर (संकेत स्थळ www.scholarships.gov.in) वर रजिस्ट्रेशन आवश्यक असून त्याकरीता संस्थांनी रजिस्ट्रेशन (Institute KYC) अर्ज भरुन त्यास मंजूर घेणे आवश्यक आहे. सदर रजिस्ट्रेशन करीता संस्थांकडे All India Survey on Higher Education (AISHE) कोड प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तरी ज्या संस्थांनी सदर प्रमाणपत्र प्राप्त केलेले नसेल अशा संस्थांनी त्वरीत ते प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. ज्या संस्थांचे NSP पोर्टलवरील रजिस्ट्रेशन अपूर्ण असेल व **या कारणास्तव संस्थेत शिकणारा कोणताही पात्र विद्यार्थी केंद्र शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.**

संस्थांनी त्यांच्या National Scholarship Portal (NSP) पोर्टलवरील रजिस्ट्रेशन व All India Survey on Higher Education (AISHE) कोड प्रमाणपत्राची माहिती सोबत जोडलेल्या गुगल शिट मध्ये **दिनांक ०७.११.२०२० पर्यंत** अद्ययावत करावी.

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे